नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १४७ | Issue - 147 | वार रविवार दि. १३ ऑक्टोबर २०२४ | Blow- Sunday Date 13 October 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# बाबा सिद्दिकींची गोळ्या झाडून हत्या

## हरियाणा-यूपी कनेक्शनचा संशय; दोन संशयित पोलिसांच्या ताब्यात!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते बाबा सिद्दिकी यांची शनिवारी रात्री गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे मुंबईच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून गृह विभागाच्या कार्यक्षमतेवर विरोधकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे. बाबा सिद्दिकी हे या वर्षाच्या सुरुवातीला म्हणजेच फेब्रुवारी महिन्यात काँग्रेसमधून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात दाखल झाले होते. आज संध्याकाळी मुंबईच्या वांद्रे भागात त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. यासंदर्भात पोलिसांनी माध्यमांना माहिती दिली आहे.



बाबा सिद्दिकी त्यांचे पुत्र आमदार झिशान सिद्दिकी यांच्या वांद्रे येथील कार्यालयाजवळ असताना त्यांच्यावर चार गोळ्या झाडण्यात आल्या. त्यातील एक गोळी बाबा सिद्दिकी यांच्या छातीत लागली. या हल्ल्यात एक गोळी त्यांच्या सहकाऱ्यालाही पायाला लागली. यानंतर या दोघांना रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आलं. मात्र, बाबा सिद्दिकींचा मृत्यू झाल्याचं आता लीलावती रुग्णालयाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. दरम्यान, बाबा सिद्दिकी यांना रुग्णालयात दाखल करण्याआधीच त्यांचा मृत्यू झाला होता असं आता सांगितलं जात आहे.

बाबा सिद्दिकींवरील गोळीबारासंदर्भात मुंबई पोलिसांनी सविस्तर माहिती दिली आहे. त्यानुसार, बाबा सिद्दिकींवर शनिवारी रात्री साडेनऊच्या सुमारास गोळ्या झाडण्याची घटना घडली. या प्रकरणात पोलिसांनी दोन संशयित व्यक्तींना ताब्यात घेतलं आहे. यासंदर्भातला पुढील तपास गुन्हे अन्वेषण विभाग करत असल्याची माहितीही पोलिसांकडून सांगण्यात आली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली असून त्यात ताब्यात घेण्यात आलेल्या हल्लेखोरांबाबत त्यांनी माहिती दिली आहे. ताब्यात घेतलेल्या दोन आरोपींपैकी एक आरोपी हरियाणाचा आणि दुसरा आरोपी उत्तर प्रदेशचा असल्याचं समोर आलं आहे. त्याशिवाय, तिसरा आरोपी फरार असून त्याचा शोध पोलीस घेत आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

दरम्यान, बाबा सिद्दिकी यांच्या हत्येमागे उत्तर भारतातील मोठ्या गँगचा हात असल्याचा संशय आता यातून व्यक्त होऊ लागला आहे.

# गुजरातमध्ये भिंत कोसळून सात मजूरांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मेहसाना/अहमदाबाद : गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यात एक दुर्दैवी घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. एका कंपनीची भूमिगत टाकी खोदत असताना मजुरांच्या अंगावर अचानक वरील माती कोसळल्यामुळे ७ मजुरांचा ढिगाऱ्याखाली अडकल्यामुळे मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे मेहसाणा जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. ही घटना घडल्यानंतर तातडीने जिल्हा प्रशासनाला माहिती देण्यात आली होती. त्यानंतर स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरु केले. पण तोपर्यंत या ७ मजुरांचा ढिगाऱ्याखाली अडकून मृत्यू झाला.



मेहसाणाच्या जसलपूर जवळील एका गावात हे सात मजूर एका कंपनीसाठी भूमिगत टाकी खोदण्याचं काम करत होते. हे काम जवळपास पूर्ण होण्याच्या मार्गावर होते. पण शनिवारी खोदकाम सुरु असताना अचानक वरील माती मोठ्या प्रमाणात आतमध्ये ढासळली. त्यामुळे काही क्षणात आतमध्ये काम करणारे कामगार त्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. त्यामुळे एकच खळबळ उडाली. त्यानंतर स्थानिक प्रशासनाला या घटनेची माहिती देण्यात आली. त्यानंतर स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत तातडीने मदतकार्य सुरु केले. पण त्या मजुरांना वाचवण्यास यश मिळाले नाही.

या घटनेबाबत पोलिसांनी सांगितलं की, या घटनेत सात बांधकाम कामगारांचा मृत्यू झाला आहे. मात्र, यामध्ये आणखी काही कामगार अडकल्याची भिती व्यक्त करण्यात येत आहे. ढिगाऱ्याखाली आणखी कामगार अडकले आहेत का? याचा शोध घेतला जात असून बचावकार्य अद्यापही सुरू आहे. सध्या जेसीबीच्या सहाय्याने माती काढण्याचे काम सुरु असल्याची माहिती देण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्हा विकास अधिकारी डॉ. हसरत जास्मिन यांच्या म्हणण्यानुसार, दुपारी १:४५ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. तसेच आणखी काही कामगार आतमध्ये अडकल्याची शक्यता आहे. आतापर्यंत ७ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. तसेच एकूण ८ ते ९ जण हे खोदकाम करण्याचं काम करत होते, अशी माहिती आहे. त्यामुळे अजून मजूर यामध्ये अडकल्याची शक्यता आहे. खोदकाम सुरु असताना अचानक माती खचल्यामुळे हे मजूर मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

## थोडक्यात

### यावेळेस उलथापालथ करावीच लागेल : मनोज जरांगे पाटील

पंढरपूर/प्रतिनिधी : बीड जिल्ह्यातील नारायण गडावर मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली होत आहे. राज्यात नेण्यासाठी आंदोलन सुरू आहे करोडोच्या संख्येने समाज न्यायासाठी लढतोय. सहन करतोय आमचा मूळ समाज सहन करण्याचा नाही पण. मूळ स्वभाव फार दिवस लपून राहत नाही. नारायणगडावर मला काही मर्यादा पळावे लागत आहेत, पण न्याय मिळाला नाही तर आपल्याला उलथापलथ करावीच लागेल आपल्या नाकावर टिचून कुठले निर्णय होणार असतील तर आपल्याला शांत बसता येणार नाही आपला दोष काय आहे हे कुणालाच आपला सांगता येत नाही षडयंत्र केले जात असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले आहे.

### भाजी घेत असताना तरुणाचा मोबाईल लंपास

सोलापूर : भाजी खरेदी करत असताना अज्ञात चोरट्याने तरुणाच्या खिशातील ठेवलेला महागड्या कंपनीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना सैफुल भाजी मार्केट येथे ३० सप्टेंबर रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी ऋषिकेश विश्वनाथ गायकवाड (वय-३९-,रा.साई पॅराडाईज,ओम गर्जना चौक) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# बाबा सिद्दीकींच्या हत्येनंतर शरद पवारांनी केली देवेंद्र फडणवीसांच्या राजीनाम्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) नेते बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळीबार करण्यात आला असून या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. आज रात्री ९ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. वांद्रे येथील निर्मल नगर परिसरात हा हल्ला करण्यात आला. या घटनेनंतर आता राज्यात खळबळ उडाली आहे. तसेच राजकीय प्रतिक्रियाही उमटू लागल्या आहेत. दरम्यान, या घटनेनंतर आता शरद पवार यांनी



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे.

राज्याची कोलमडलेली कायदा सुव्यवस्था चिंता वाढवणारी आहे. देशाच्या आर्थिक राजधानी मुंबईत माजी राज्यमंत्री बाबा सिद्दीकी यांच्यावर झालेला गोळीबार खेदजनक आहे. गृहमंत्री आणि सत्ताधारी एवढ्या सौम्यतेने राज्याचा गाडा हाकणार असतील तर सामान्य जनतेसाठी धोक्याची घंटा ठरू शकते, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली. पुढे बोलताना, या प्रकरणाची केवळ चौकशी नको तर जबाबदारी स्वीकारून सत्ताधाऱ्यांनी आपल्या पदावरून पायउतार होण्याची गरज आहे, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच बाबा सिद्दीकी यांच्याप्रती भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करतो, असेही ते म्हणाले.

मिळालेल्या माहितीनुसार, बाबा सिद्दीकी हे वांद्रे येथील खेरवाडी सिग्नलजवळ झिशान सिद्दीकी यांच्या ऑफिसमध्ये चालले होते. त्यावेळी तीन अज्ञात व्यक्तींनी बाबा सिद्दीकींवर गोळीबार केला आणि त्यानंतर हे तिघंही (पान २ वर..)

# दसऱ्याच्या मुहूर्तावर राज्यभरात सोने खरेदीची लगबग

मुंबई : देशाच्या बहुतांश भागात झालेला समाधानकारक पाऊस, बाजारातील आकर्षक सुवर्ण खरेदी योजना आणि शुभ मुहूर्तावर खरेदीची परंपरा यामुळे दसऱ्याला सराफी बाजारात सोनेखरेदीची लगबग व उत्साह दिसून आला.



दसरा हा सोनेखरेदीचा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आहे. त्यामुळे सोन्याचा भाव आता दहा ग्रॅमला स्थानिक सराफ बाजारात ७६,७०० रुपयांच्या पुढे गेला असला, तरी परंपरेमुळे यंदाही लोकांनी सोनेखरेदी गर्दी केली. मुहूर्तावर सोनेखरेदीचे महत्त्व असल्याने दुपारी असलेल्या विजय मुहूर्तामुळे दालनांमध्ये खरेदीला गर्दी झाली असे पीएनजी अँड सन्स लि.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित मोडक यांनी सांगितले. (पान २ वर...)

# भारतीय संघाने दसऱ्यालाच साजरी केली दिवाळी, उत्तुंग फटकेबाजीसह दणदणीत विजय

नवी दिल्ली : भारत आणि बांगलादेश यांच्यातील तीन सामन्याच्या टी-२० मालिकेतील शेवटचा हैदराबादमध्ये पार पडला. या सामन्यात भारताने संजू शतकी आणि सूर्याच्या वादळी अर्धशतकाच्या जोरावर १३३ धावांनी दणदणीत पराभव केला. त्याचबरोबर सलग तिसरा सामना जिंकत बांगलादेशला क्लीन स्वीप केलं. या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम



फलंदाजी करताना ६ बाद विक्रमी २९७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात बांगलादेश संघ निर्धारित २० षटकात १६४ धावाच करु शकला. अशा प्रकारे भारतीय संघाने दसऱ्यालाच दिवाळी साजरी केली.

भारताकडून बिश्नोईने तीन, तर वेगवान गोलंदाज मयंक यादवने दोन विकेट्स घेतल्य. बांगलादेशकडून तौहीदने ४२ चेंडूत ६३धावा केल्यानंतर नाबाद राहिला. भारताने कसोटी मालिकेतही बांगलादेशचा २-० असा क्लीन स्वीप केला होता आणि आता (पान २ वर..)

**भाविकांना विठ्ठलाचे दर्शन होणार सुलभ**

**शासन निर्णय जारी, १३ कोटीचा निधी वितरित करण्यास ही शासनाची मान्यता**

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर दर्शन मंडप आणि दर्शन रांग करण्यासाठी शासनाकडून १२९.४९ कोटीच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्यामध्ये पर्यटन विकसित करुन त्याद्वारे स्थानिक अर्थव्यवस्था वृद्धिंगत करण्याकरीता आणि स्थानिकांना रोजगाराची संधी निर्माण करण्यास मोठा वाव असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेऊन तसेच महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, पंढरपूर येथे यात्रा कालावधी दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात उभा करण्यात येणारा दर्शनमंडप आणि दर्शनरांग याकरीता कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समिती, सोलापूर यांनी येथील दि.१६ जुलै २०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. हा प्रस्तावास मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिर, पंढरपूर येथे कायमस्वरुपी दर्शनमंडप आणि दर्शनरांग करणेकरीता शासन निर्णयनुसार १२९.४९ कोटी रकमेच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता तर १३

**अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या दर्शन मंडप आणि दर्शन रांगेसाठी शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्याने यासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या प्रयत्नांना यश**




कोटी इतका निधी वितरीत करण्यासही यात मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रकल्पात नमुद अंदाजपत्रकातील कामाच्या बाबी व त्यांचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

दर्शन मंडप - मुलभूत सुविधा व इलेक्ट्रिकल वर्क सहित ८७ कोटी ३१ लाख तर दर्शन रांग (स्कायवॉक) सर्व सुविधायुक्त व इलेक्ट्रिकल वर्क सहित ४२ कोटी १८ लाख इतक्या निधीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून या कामाकरता १३ कोटीचा निधी सन २०२४ २५ या वर्षात वितरित करण्यास मान्यता मिळालेली आहे.

### जिल्हाधिकारी यांचा सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दर्शन मंडप व स्काय वॉकचा बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच पंढरपूर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दर्शनाची सुलभ व्यवस्था व्हावी यासाठी अत्यंत नियोजनबद्धरित्या हा आराखडा तयार केला. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी हा आराखडा प्रथम पालकमंत्री चंद्रकांत पाटील पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखालील समितीत मंजूर करून घेतला. त्यानंतर १७ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीत हा आराखडा प्राथमिक दृष्ट्या मंजूर झालेला होता, त्यानंतर २३ सप्टेंबर रोजी या समितीने या आराखड्यास मंजुरी दिली. व २४ सप्टेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या आराखड्याला अंतिम मंजुरी दिलेली आहे. याबाबतचा शासन निर्णय दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रोजी निघालेला आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मागील अनेक वर्षापासून प्रलंबित राहिलेला दर्शन मंडप व दर्शन रांगेचा प्रश्न आता लवकरच सुटणार असून यामुळे महाराष्ट्र राज्य सह देशभरातील विठ्ठल भक्तांना श्री विठ्ठलाचे दर्शन सहज व सुलभ होणार आहे.

### दर्शन म्हणतात देण्यात येणाऱ्या विविध सुविधा

प्रस्तावित दर्शन मंडपमध्ये पिण्याच्या पाण्याचे (पान २ वर..)

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## बाबा सिद्दीकींच्या हत्येनंतर शरद पवारांनी केली देवेंद्र फडणवीसांच्या राजीनाम्याची मागणी

(पान १ वरून..) तिथून पसार झाले. यापैकी दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. मात्र, बाबा सिद्दीकींवर गोळीबार करण्यामागचं कारण काय होतं?याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही.

बाबा सिद्दीकी हे १९९९, २००४ व २००९ मध्ये असे सलग तीन वेळा ते विधानसभेवर निवडून आले होते. त्यांना २००४ ते २००८ या कालावधीत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारमध्ये राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी पक्षाने दिली होती. अर्थसंकल्प असो, पुरवणी मागण्या असो, की विशेष चर्चा असा मुंबईचे प्रश्न विशेषतः झोपडपट्ट्यांचे, चाळींचे, नागरी सुविधांचे प्रश्न ते हिरिरीने मांडत असत. २०१४ च्या मोदी लाटेत त्यांचा पराभव झाला होता. २०१९ मध्ये त्यांनी निवडणूक लढविली नाही, परंतु आपल्या मुलाला झिश्यान सिद्दीकी याला मतदंरसंघ बदलून वांद्रे पूर्वमधून निवडून आण-ले. काही दिवसांपूर्वीच त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश केला होता. बाबा सिद्दीकी हे त्यांच्या इफ्त-ार पार्टीसाठी ओळखले जात असत. त्या पार्ट्यांमध्ये शाहरुख खान, सलमान खान, संजय दत्त यांच्यासारखे बॉलिवूड स्टार्स जात असत.

## नवी मुंबईतील पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष दशरथ चव्हाण यांचा अभिष्टचिंतन सोहळा

### संघटनेचा तळागाळातील कार्यकर्त्यांशी दृढ नाते जपण्याचा संदेश!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी मुंबई: महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दशरथ चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते चव्हाण यांचा साईबाबांची मूर्ती, शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. हा सन्मान सो-हळा मुंबई येथे पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता, जिथे संघटनेचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. विश्वासराव आरोटे यांचे संघटनात्मक नेतृत्वाचे विचार: या प्रसंगी बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी संघटनेत प्रत्येक कार्यकर्त्याचे महत्त्व स्पष्टपणे मांडले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भूमिकेवर विशेष भर देत सांगितले की, संघटनेतील प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्ता हा म हत्त्वाचा घटक आहे. जर संघटनेचा नेता आपल्यासोबत असलेल्या कार्यकर्त्यांच्या सुखदुःखात सामील होऊन त्यांच्याशी सुसंवाद साधतो, तर ते कार्यकर्त्यांशी दृढ संबंध निर्माण करण्यास मदत करते. नेत्याचे यश हे केवळ त्याच्या पदामुळे नसते, तर कार्यकर्त्यांच्या समर्पणामुळेच ते शक्य होते.

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी कार्यकर्त्यांच्या समर्पणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, या जगात अनेक नेते आहेत, पण अनेकजण पद मिळाल्यानंतर आपल्या कार्यकर्त्यांना विसरतात. मात्र महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने कधीही असे केलेले नाही. आम्ही नेहमीच तळ-ागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम केले आहे. संघटनेच्या प्रत्येक सदस्याचा सन्मान राखणे हेच आमचे प्रमुख कर्तव्य आहे.

कार्यकर्त्यांच्या योगदानाबद्दल विशेष गौरव:

डॉ. विश्वासराव आरोटे पुढे म्हणाले की, वृत्तपत्र विक्रेत्यांपासून ते संपादकांपर्यंत सर्वांनाच संघटनेत योग्य स्थान दिले गेले आहे. संघटनेचा विकास हे केवळ नेतृत्वाचे श्रेय नसून, कार्यकर्त्यांच्या परिश्रमाचा परिणाम आहे. संघटनेतील एकेक कार्यकर्ता हा लाखोंचा पोशिंदा आहे, जो संघटनेला पुढे नेतो. त्यामुळे त्यांच्या निष्ठेला आदर देणे गरजेचे आहे.

त्यांनी असेही नमूद केले की, संघटनेतील कार्यकर्त्यांनी आपले काम नेहमीच विश्वासाने आणि निष्ठेने केले आहे. यामुळे संघटनेला राज्यभर यश मिळाले आहे. आमचे उद्दिष्ट केवळ व्यक्तिगत लाभ मिळवणे नसून, तळ-ागाळातील पत्रकार, संपादक आणि वितरकांच्या प्रश्नांसाठी लढणे हे आहे. संघटनेच्या माध्यमातून आम्ही पाच राज्यांमध्ये यशस्वीपणे काम करत आ-होत, आणि याचा श्रेय संघटनेतील कार्यकर्त्यांनाच जाते.

संघटनेतील एकतेचा आदर्श:

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी त्यांच्या भाषणात नेतृत्व आणि कार्यकर्त्यांच्या नात्याच्या महत्वावर जोर दिला. संघटनेतील प्रत्येकाचा सन्मान राखणे हेच आमचे परम कर्तव्य आहे. अनेक ठिकाणी नेत्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांचा फक्त वापर केला आणि नंतर त्यांना विसरले. परंतु, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने कधीही असे केले नाही आणि करणारही नाही. संघटनेतील प्रत्येक सदस्य आणि कार्यकर्ता तितकाच महत्त्वाचा आहे, जितका संघटनेचा नेता.

पत्रकार संघाच्या लढ्याची यशस्वी कहाणी:

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने गेल्या पंचवीस वर्षांपासून पत्रकार, संपादक, आणि वृत्तपत्र वितरकांच्या विविध समस्यांसाठी राज्य सरकारकडे सातत्याने लढा दिला आहे. या संघर्षात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी आपला खिसा रिकामा करून संघटनेच्या विविध कार्यक्रमांसाठी आणि मागण्यांसाठी योगदान दिले आहे. आरोटे यांनी सांगितले की, कितीही निंदा केली जावी, आमचे काम करत राहणे हाच आमचा धर्म आहे. संघटनेच्या प्रगतीसाठी प्रत्येक कार्यकर्ता आणि पदाधिकारी महत्त्वाचा आहे.

या सोहळ्यात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सचिव नयन डुंबरे आणि पत्रकार मयूर ढोबळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित पत्रकारांनी डॉ. विश्वासराव आरोटे यांचे विचार ऐकून त्यांच्या नेतृत्वाखालील संघटनेच्या एकतेची आणि निष्ठेची प्रशंसा केली.

संघटनेची भविष्यातील वाटचाल:

संघटनेच्या नेतृत्वाने जसे यशस्वी संघर्ष केले, तसेच भविष्यातील आव्हानांवर मात करण्यासाठीही संघटना पूर्ण तयारीत आहे. कार्यकर्त्यांनी नेतृत्वावर ठेवलेला विश्वास आणि संघटनेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठीचे समर्पण हेच संघटनेच्या प्रगतीचे खरे साधन असल्याचे डॉ. विश्वासरावआरोटे यांनी स्पष्ट केले. संघटनेत कार्यकर्त्यांची भूमिका कशी महत्त्वाची आहे, यावर भाष्य करताना डॉ. आरोटे यांनी संघटनेला एकत्र ठेवण्यासाठी कार्यकर्त्यांच्या निष्ठेला आदर दिला आणि प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्ता संघटनेचा आधारस्तंभ असल्याचे सांगितले.

**– डॉ. विश्वासराव आरोटे**
**कळसुबाई शिखरावरून!**

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर दर्शन मंडप आणि दर्शन रांग करण्यासाठी शासनाकडून १२९.४९ कोटीच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता

(पान १ वरून..)

सुविधा, शौचालय, लिफ्ट सुविधा, वैद्यकीय सुविधा, अल्पोपहार आपत्कालीन म ार्ग प्रसाद व सुरक्षा व्यवस्था हिरकणी कक्ष व दिव्यांग सुविधा अत्यावश्यक वाहन व्यवस्था आदी सुविधा असण-ार आहेत.प्रशस्त दर्शन मंडप असल्याने भाविकांना सुरक्षित सुसह्य सुविधायुक्त दर्शनाची सोय होणार आहे. स्काय वॉक असल्याने स्थानिकांना दर्शन रांगेचा कोणताही त्रास होण-ार नाही. तसेच भाविकांचा दर्शनाचा कालावधी कमी करणे शक्य होईल. तसेच भाविकांना अन्नछत्राच्या माध्यमातून विनाम ूल्य जेवणाची सुविधा पुरवली जाणार आहे.भाविकांना कमी वेळेत दर्शन होण्यासाठी दर्शन टोकन यंत्रणा उभारण्यात येईल ज्यामुळे भाविकांना कमी वेळेत दर्शन करता येईल. याशिवाय प्रस्तावित प्रकल्पात दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक तसेच स्तनदा मातांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे.

श्रींच्या दर्शनरांगेत कायम स्वरूपी व्यवस्था करण्याच्या दृष्टीने स्कायवॉक व दर्शनहॉल बांधकाम करणेकामी आराखडा तयार करून मंदिर समितीने सन २०१८ मध्ये सभेत ठराव पारीत केला होता. या दर्शन हॉल व स्कायवॉकचे संपूर्ण व्यवस्थापन, टोकन दर्शन व्यवस्था, देखभाल दुरुस्ती, सुरक्षा व्यवस्था, अन्नछत्र, स्वच्छता व इतर अनुषंगिक सर्व सोयी सुविधा मंदिर समितीमार्फत उपलब्ध करून देण्याबाबत मंदिर समितीने पुढाकार घेतला आहे. या आराखड्यातील काम पूर्ण झाल्यानंतर दर्शनार्थी भाविकांना जलद व सुलभ दर्शन होण्यास मदत होणार आहे.

## भारतीय संघाने दसऱ्यालाच साजरी केली दिवाळी, उत्तुंग फटकेबाजीसह दणदणीत विजय

(पान १ वरून...) टी-२० मालिकेतही क्लीन स्वीप करण्यात त्यांना यश आले. या सामन्यात भारताने आपल्या टी-२० इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या उभारली आणि सुरुवातीपासूनच भारतीय गोलंदाज बांगलादेशवर दडपण आणण्यात यशस्वी ठरले. संजू सॅमसनने या सामन्यात केवळ दमदार शतकच केले नाही तर एक मोठा विक्रमही रचला आहे. संजू सॅमसनने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतासाठी दुसरे सर्वात जलद शतक झळकावले. भारतासाठी सर्वात जलद शतक झळकावण्याचा विक्रम आजही टीम इंडियाचा माजी टी-२० कर्णधार रोहित शर्माच्या नावावर आहे. रोहित शर्माने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अवघ्या ३५ चेंडूत शतक झळकावले. संजूने या सामन्यात एकूण ४७ चेंडूत ११ धावा केल्या. यादरम्यान त्याने ११ चौकार आणि ८ षटकारही मारले. संजूच्या या खेळीमुळे भारतीय संघाने या सामन्यात २० षटकात २९७ धावा केल्या. जी टी-२० आंतरराष्ट्रीय मधील दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या आहे.

## दसऱ्याच्या मुहूर्तावर राज्यभरात सोने खरेदीची लगबग

(पान १ वरून..) आजकाल गुंतवणूक म्हणून 'गोल्ड ईटीएफ' अर्थात म्युच्युअल फंडाच्या म ाध्यमातून 'पेपर गोल्ड' घेण्याकडेही नागरिकांचा कल वाढत असल्याचे गुंतवणूकतज्ज्ञांनी सांगितले. सुवर्ण बाजारपेठेत शनिवारी दसरा सणानिमित्त सोने खरेदीसाठी मोठी गर्दी झाल्याने दिवसभरात सुमारे १० कोटी रुपयांची उलाढाल झाली. आदल्या दिवशीच्या तु-लनेत सोने दरात प्रति १० ग्रॅम ४०० रुपयांनी वाढ झाली. सुवर्ण बाजारात शुक्रवारी २४ कॅरेट सोन्याचा दर ७६,२०० रुपये प्रति १० ग्रॅम होता, तर २२ कॅरेटचा दर ६९, ८५३ रुपये इतका होता. तुलनेत शनिवारी २४ कॅरेट सोन्याचा दर ४०० रुपयांनी वधारून ७६,६०० रुपये झाला. २२ कॅरेटच्या दरात ३१७ रुपयांनी वाढ होऊन ते ७०,१७० रुपये झाले. चांदीचे दर शुक्रवारी ९२,००० रुपये प्रतिकिलो तर, शनिवारी ९१,७५० रुपये असे होते. गेल्या वर्षी झालेल्या विक्रीच्या तुलनेत यंदा दसऱ्याला १० टक्के अधिक विक्री झाली. १४ कॅरेट दागिन्यांना विशेष म ागणी होती. कारण सोन्यापोटी होणारा खर्च काही प्रमाणात कमी होत असल्याने या दागिन्यांकडे ओढा अधिक होता.

## श्री विठ्ठलास अलंकार; रूक्मिणी मातेस पारंपारिक श्री विजयालक्ष्मी पोशाख सह अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी :

घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दुपारी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे खंडेमहानवमी विजयादशमी दसरा दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आ-हेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस श्री.विजयालक्ष्मी पोशाख परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक म नोज श्रोत्री यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याची पगडी, नामनिळाचा, कौस्तुभ मणी, दंड पेठया जोड, कंगन जोड, हिऱ्याचा मोत्याचा तुरा, शिरपेच लहान, मोत्याची कंटी दोन पदरी, मोठ्याची कंठी एक पदरी, बाजीराव कंठा, पुतळ्यांची माळ, मोहरांची माळ, तुळशीची माळ एक पदरी मोठी, बोरमाळ तीन पदरी, हिऱ्यांचे पैंजण, नवरत्नांचा हार, सोन्याचे घोंगडे, चांदीची कंठी, सोन्याचे पितांबर, सोन्याचे तोडे जोड, लॉकेट इ.

तसेच *रुक्मिणी म ातेस जडावाचा मुकुट, जडावाचा हार, नवरत्नाचा हार, जडावाचे बाजूबंद जोड, खड्यांची वेणी, पाचूची गरसोळी, चिंचपेटी हिरवी, हातसर जोड, पानाड्याचा हार, मद्रासी कंठा, दशावत-ारीहार, सोने साडी, मासपट्टा, तुळशीची माळ, शिंदे हार, जडावाचे ताणवाड जोड, चंद्र, सूर्य, बाजीराव गरसोळी, पेटींची



बिंदी, खाड्यांच्या पाटल्या जोड, सोन्याचे बाजूबंद जोड, म त्स्य जोड, रुळझोड, मोठी नथ, कर्ण फुले, सोन्याचा करंडा, छत्रछामर, तोडेजोड, चंद्रहार, इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच राधिका मातेस चांदीचे मुकुट, पुतळ्यांची माळ, हायकोल, जवेच्या माळा, लक्ष्मीहार व *सत्यभामादेवीला नक्षी टोप, चिंचपेटी तांबडी, ठुशी नवीन, जवमनी पदक, जवेची माळ, मोहरांची माळ, इत्यादी अलंकार व प्रथा परंपरेप्रमाणे पोशाख परिधान करण्यात आलेले आहेत.तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लम ादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

## नासिक ते कोटमगाव येवला सायकल वारीचे निफाडला जंगी स्वागत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नासिक सायकलीस्ट फौंडेशन शारदीय नवरात्रोस्तवानिमित्त सालाबादप्रमाणे याही वर्षी नासिक सायकलीस्ट व रॉयल रायडर्स मिळुन सुमारे ४५० सदस्यांनी यात सहभाग नोंदविला, तर काहींनी परतीचा प्रवास सुद्धा सायकलनेच पुर्ण केला. निफाड सायकलीस्टच्या १८ सदस्यांनी निफाड ते कोटमगाव व परत असा १०० किमी प्रवास पुर्ण केला.

निफाड येथे दिपक भुतडा यांचे सुदर्शन ट्रेडर्स येथे नासिकहुन आलेल्या सर्व सायकलीस्टचे गुलाब पुष्प देऊन.स्वागत करण्यात आले. .

सायकलीस्टने स्वादिष्ट अल्पोपहार व चहापानाचा आस्वाद घेऊन पुढील प्रवासास सुरुवात केली.

या प्रसंगी नासिक सायकलीस्टचे अध्यक्ष राजेंद्र वानखेडे, प्रवीण खाबिया, किशोर म ाने, सुर्यकांत आहेर, जे एस पवार, रवींद्र दुसाने, नाईक सर, सतीष काका, अमित घुगे, सचिन नरोटे, गणेश पाटील, रॉयल रायडरचे डॉ आबा पाटील, अनिल बोरस्ते, विद्यमान अध्यक्ष किशोर काळे, उपाध्यक्ष अरुण पवार, डॉ मनीषा रौन्दळ, सचिव संजय पवार संचालक दिपक भोसले, सुरेश डोंगरे, रत्नाशील राजे पवार, माधुरी गडाख, प्रवीण कोकाटे, पंकज पाटील, बजरंग कहाटे वारी प्रमुख बाबु दादा ताजनपुरे, कारभारी भोर, संदीप दराडे व सायकलीस्ट कैलास भागवत, शिवाजी काकड यांचा निफाड सायकलीस्टच्या वतीने स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी निफाड नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, नगरसेवक संदीप शिंदे, देवदत्त कापसे , तन्वीर राजे, गणेश कापसे, सुनील शेठ भुतडा, सुदर्शन भुतडा, संजय शेठ लुक्कड, दिपक जाजु , भोसले वकील, निफाड सायकलीस्ट चे अध्यक्ष प्रवीण तनपुरे, उपाध्यक्ष अशोक कोल्हे, संचालिका डॉ सिमा डेर्ले सदस्य दिपक घंगाळे , संदीप गवळी , राजेंद्र गवळे, प्रवीण कहाणे, दिपक बोरसे, ओंकार घंगाळे, पांडुरंग कडवे, शिवाजी शिंदे, शरयू कडवे, धनंजय कापसे, सुनील शर्मा, सौ पूजा मगर, सौ मनीषा वाघ, सौ ज्योती चोरडिया उप-स्थित होते सर्वांचे हस्ते मान्यवरांच यथोचित सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमासाठी हॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल भुतडा परिवाराच्या वतीने सुदर्शन यांना सन्मानित करण्यात आले.

## अवताडे शुगरचे पाच लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : अवताडे शु-गरचे पाच लाख मॅट्रिक टन ऊस गाळपा-चे उद्दिष्ट पूर्ण करणार कर्मचाऱ्यांना एक महिन्याचा पगार दिवाळी बोनस तृतीय बॉयलर अग्निप्रतिपदन समारंभ कार्यक्रमास प्रदीपन चेअरमन संजय आवताडे यांनी घोषणा केली.

मंगळवार दिनांक १२ पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार सम ाधान आवताडे यांच्य मार्गदर्शनाखाली सुरू असलेले अवताडे शुगरचे नेहमी शेतकऱ्यांच्या उसाला शेतकऱ्यांच्या उसाला यावर्षी कारखान्याचे पाच लाख मेट्रिक टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे अस प्रतिपादन अवताडे शुगर चे चेअरमन संजय आव-ताडे यांनी केले.




नंदुर तालुका मंगळवेढा येथील टेस्टलरी प्रा लि या साखर कारखान्याच्या तृतीय बॉयलर अग्नी प्रति पण समारंभात ते बोलत होते यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती माजी सभापती दामाजी कारखान्याची माजी संचालक भारत निकम विजय माने, बापू काकेकर, मारा पुढचे सरपंच विनायक यादव, श्री आजबे दामाजी कारखाने जे माझे सरपंच सुहास पवार, अविनाश मोरे, श्याम पवार, यड्रावजी चंद्रकांत गोडसे, जखऱ्या नरोटे उपसरपंच सुहास पवार टेक्निकल व्यवस्थापक सुहास इन्चार्ज सुनील काम ते चीफ केमिस्ट मोहन पवार, बिसलरी मॅनेजर संभाजी फाळके, शेती अधिकारी राहुल नागणे, तोहीद शेख, ऊस पुरवठा अधिकारी दामोदर रीचे चिप अकाउंट बजरंग जाधव स्टोर कीपर डेपोटी चीफ मिनिस्टर प्रताप मोरे असिस्टंट सुरक्षा अधिकारी रणजीत पवार यांच्यासह अधिकारी ऊस उत्पादक कर्मचारी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## टाकळीवाडी येथे श्री दुर्गामाता महादौडला मोठा प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे विजयादशमी दसरा महादौड मध्ये श्री गुरुदत्त शुगर्स एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुल घाटगे दादा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आज असंख्य महिला,मुली या महादौडला उपस्थितीत होत्या. सर्वांचा तेज,जल्लोष,पाहून मन समाधानी झाले असे राहुल घाटगे दादा बोलताना म्हणाले. संपूर्ण गावातून महादौड सुरुवात झाली.

शिवप्रतिष्ठान हिंदुस्थ-ान टाकळीवाडी यांच्यावतीने महादौड आज सांगता झाली. संपूर्ण गावातून महादौड निघ-ाली. गावकऱ्यांनी या महादौड चे स्वागत केले. यावेळी समस्त गावकरी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### किरकोळ कारणावरून मुलाने केली बापाला मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) किरकोळ कारणावरून मुलाने दारू पिऊन येऊन वडिलांना व घरातील सुनेला शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी मुलाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ११ ऑक्टोंबर रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास नवनिर्माण रेसिडेन्सी भवानी पेठ येथे घडली.याप्रकरणी सत्यनारायण शंकरलाल चंडक (वय-६५,रा.नवनिर्माण रेसिडेन्सी भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून महेश सत्यनारायण चंडक (वय-३४) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहायक फौजदार ओव्हळ हे करीत आहेत.

### कामावरून तरुणास मारहाण ; चौघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) काम करण्याच्या कारणावरून तरुणास लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १० ऑक्टोंबर रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास मातोश्री मेझॉन ऑफिस बाळे येथे घडली.याप्रकरणी राहुल जयशंकर खरात (वय-२६,रा. मुरारजी पेठ) याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून विवेक सूर्यवंशी,रॉक ( पूर्ण नाव पत्ता माहीत नाही) व त्याच्यासोबत असलेले दोन मित्र यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी राहुल खरात हा दळवे पाटील ऑटोमोबाईल समोरील मातोश्री मेझॉन ऑफिस बाळे याठिकाणी कामास गेला.त्यावेळी ऑफिसमधील पार्सल वेगवेगळे करत असताना विवेक हा तेथे आला व त्याने देखील पार्सल वेगवेगळे करण्यास राहुल याला सांगितले. त्यावेळी राहुल याने नकार देताच तू माझे काम करत नाही का असे म्हणत फिर्यादी राहुल खरात याला शिवीगाळ करत हातातील कड्याने डोक्यात मारले.त्यानंतर ऑफिसमध्ये काम करणारे दशरथ अनपढ व सुमित याने सोडवा-सोडवी केली.दरम्यान राहुल याच्या डोक्यातून रक्त येत असल्याने हॉस्पिटलला बाहेर जाण्यासाठी आला असता,त्यावेळी पुन्हा विवेक याने व वरील सर्वांनी मिळून खाली पाडून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल घुगे हे करीत आहेत.

# हर्षवर्धन पाटलांच्या रुपाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला लागले ग्रहण; निष्ठावंत कार्यकर्ते नाराज

## परिवर्तन मेळाव्यास नागरिकांची तुफान गर्दी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे

इंदापूर येथे राष्ट्रवादी (शरद पवार) निष्ठावंत नाराज गटाचा आज शुक्रवारी (दि. ११) परिवर्तन मेळावा पार पडला. या मेळाव्यात इंदापूर तालुक्यातील जनतेने अपक्ष निवडणूक लढवण्याचा आग्रह आप्पासाहेब जगदाळे व प्रवीण माने यांना केला. जनतेच्या आग्रहा नुसार अपक्ष निवडणूक लढवण्याची घोषणा करण्यात आली.आता कोणत्याही परिस्थितीत माघार घेतली जाणार नाही असे सांगण्यात आले. यावेळी परिवर्तन मेळाव्यास इंदापूर तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. इंदापूरच्या इतिहासातील गर्दीचे सर्व रेकॉर्ड मोडल्याची चर्चा होती. यावेळी तालुक्याच्या चौफेर विकासासाठी परिवर्तन घडवण्याचे आवाहन प्रवीण माने यांनी केले.

निरा डावा कालवा, खडकवासला कालवा, उजनी धरण, निरा नदी यांच्या पाण्याचे प्रश्न आजही भेडसावत असून ते सोडवण्यासाठी परिवर्तन घडवा असे त्यांनी आवाहन केले. तालुक्यातील जनतेचा सेवक म्हणून काम करण्याची संधी उमेदवाराला द्यावी असेही त्यांनी सांगितले.

यावेळी सोनाई ग्रुपचे अध्यक्ष दशरथ माने, पीडीसीसी बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, कर्मयोगी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष भरत शहा, बाबासाहेब चौरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दत्तात्रय फडतरे, कांतीलाल झगडे, शकील सय्प्रयद , दीपमामा जगदाळे, तुषार जाधव, अमोल मुळे, सुनील खाडे, हनुमंत सानप उपस्थित होते.

### शरदचंद्र पवार साहेब तुम्ही आमचे विठ्ठल आहात आत्तातरी निर्णय बदला

**हर्षवर्धन पाटील तंबूत घुसला तर... तंबूच शिल्लक ठेवायचा नाही, विधानसभेच्या जागे संदर्भात घेतलेला निर्णय बदला, अन्यथा आम्ही बंडखोरी केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा सोनाई परिवाराचे सर्वेसर्वा दशरथ माने यांनी आज दिला. इंदापूरमधून आम्ही शंभर नव्हे; एकशे दहा टक्के अपक्ष म्हणून निवडणूक लढवणार आहोत. आम्ही आता फार्म काढत नसतो. आम्ही एकवेळ जेलमध्ये बसू, पण निवडणूक लढवू. तुम्ही आम्हाला मतं द्याल, असे आवाहन करत, सोनाई परिवाराचे प्रमुख दशरथ माने यांनी इंदापूरमधून विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले.**

इंदापूर चे माजी आमदार हर्षवर्धन पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घेण्याचा चुकीचा निर्णय घेऊ नका. साहेब हा पठ्ठ्या जर तंबूत घुसला तर अख्खा तंबूच घेऊन जाईल, असं म्हटलं होतं आणि तसेच झालं. आमचा शरद पवारांचा राष्ट्रवादीचा तंबूच ते उचलून घेऊन गेले आहेत,असा हल्लाबोल माने यांनी केला.आजच्या परिवर्तन सभेत माने आक्रमक झाले होते.

यावेळी व्यासपीठावर या परिवर्तन मेळाव्यासाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक अप्पासाहेब जगदाळे, पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती प्रवीण माने, कर्मयोगी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा, कांतीलाल झगडे, बाबासाहेब चवरे, बाळासाहेब हरणावळ, शकील सय्यद, बापू जामदार, अर्शद सय्यद, पांडुरंग मोहिते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आप्पासाहेब जगदाळे म्हणाले की, आमचा आवाज कोणीही थांबू शकत नाही. कारण प्रामाणिकपणा महत्त्वाचा असतो. प्रामाणिकपणा आमच्यात आहे. नेता नसताना इंदापूर तालुक्यातील प्रामाणिक जनतेने खासदार सुप्रिया सुळे यांना २६ हजार मतांची आघाडी दिलेली आहे. आता हा पट्ट्या म्हणतो, अदृश्य शक्तीने आघाडी दिली आहे. अरे कोणती रे अदृश्य शक्ती आहे. कोणत्या गावातलं पाणी पिऊन आलाय तुम्ही . स्वर्गीय शंकरराव पाटील तथा भाऊंच्या पुतळ्यासमोर उभे राहून खोटे बोलत आहात. भाऊंना काय वाटले असेल, याचा जरा तरी विचार करा. तुम्ही घोलप कुटुंबीयांना बाजूला केले. भाऊंची कन्या पद्माताई भोसले यांना कारखान्यातून बाजूला केले. शहा कुटुंबीयांना संस्थेपासून दूर केले हे पाप आहे. ही जनता आणि भाऊ कधीही माफ करणार नाही, असे जगदाळे म्हणाले. यावेळी प्रवीण माने, भरत शहा, यांची भाषणे झाली.

# कळंब तालुका व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेचा जल्लोष




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/कळंब : सुधाकर रणदिवे, शासनाने वृत्तपत्र विक्रेते व पत्रकारासाठी स्वतंत्र विकास महामंडळास नुकतीच कॅबिनेट मंत्री मंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली. या निर्णयाचा कळंब तालुका व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेच्या वतीने शुक्रवार दि.११ऑक्टोबर रोजी कळंब येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाके फोडून पेढे वाटून आनंद उत्सव साजरा करण्यात आला. पत्रकारांच्या या मागणीसाठी व्हॉइस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप जी काळे यांच्या नेतृत्वाखाली लढा उभारला होता सलग तीन वर्षे शासन दरबारी पाठपुरावा करीत होते या मागणीला मोठे यश मिळाले आहे. वार्तांकन करत असताना पत्रकारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, कशाचीही तमा न बाळगता सामाजिक बांधिलकीतुन बातम्या देण्याचे काम करत आहेत. या पत्रकारासाठी राज्य शासनाने गुरुवार ता.१० रोजी झालेल्या कॅबिनेट मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,यांनी पत्र विक्रेते व पत्रकार यांच्यासाठी स्वतंत्र विकास महामंडळाची स्थापना केली आहे या निर्णयाचे स्वागत करून कळंब व्हाईस ऑफ मीडिया तालुका संघटनेच्या वतीने एम.डी लाईव्ह कळंब येथे मुख्यमंत्री व सर्व मंत्रिमंडळाचे अभिनंदन शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाके फोडून एकमेकांना व चौकातील नागरीकाना पेडे वाटून आनंदोत्सव साजरा केला. तसेच युवा सेनेचे राज्य समन्वयक नितीन लांडगे यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात येऊन सर्व पत्रकार बांधव यांना पेडा भरऊन शुभेच्छा दिल्या तसेच, तसेच लक्ष्मण शिंदे यांनी पत्रकार बांधवांना मार्गदर्शन केले यावेळी व्हाईस ऑफ इंडियाचे महाराष्ट्र राज्य कार्यवाहक अमर चोंदे,शिक्षण विभागाचे राज्यप्रमुख चेतन कात्रे ,कळंब तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक भाऊ शिंदे, पत्रकार संघाचे विश्वस्त सतीश टोणगे, ज्ञानेश्वर पतंगे, तालुका कार्याध्यक्ष राम रतन कांबळे,उपाध्यक्ष रामराजे जगताप, साप्ताहिक विंग चे राजेंद्र भाऊ बारगुले, अकीब पटेल, दीपक माळी, हनुमंत पाटोळे, महेश फाटक, सतीश तवले, लक्ष्मण शिंदे, जय नारायण दरक, समाधान जाधव, माधव सिंग राजपूत, अशोक कुलकर्णी, आदींची उपस्थिती होती.

# काँग्रेसच्या युवा संवाद मेळाव्यास तरुणांचा प्रतिसाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड विधानसभा युवक काँग्रेस च्या वतीने युवा संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष शरद आहेर हे होते तर. मेळाव्याचे उद्घाटन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमापूजनाने झाली प्रास्ताविक युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन खडताळे यांनी केले.

त्यात युथ जोडो बूथ जोडो,चलो पंचायत चलो वॉर्ड अभियान, धरणे आंदोलने,शाखा उघडणे, अशा उपक्रमांविषयी माहीती दिली. यानिमित्ताने तालुक्यातील विविध भागातून आलेल्या तरूणांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.यावेळी काँग्रेस पदाधिकारी भैय्यासाहेब देशमुख, विनायक शिंदे,सचिन होळकर, हेमंत जाधव,दिगंबर गिते आदींनी मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी शरद आहेर म्हणाले की, काँग्रेसचा पक्ष सर्व समावेशकता जपणारा असून काँग्रेसचा विचार हा सर्वधर्मसमभावाचा असून ज्या शक्तींनी लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे त्यांना संपवण्याची ताकद ही फक्त युवकांमध्ये असून यासाठी जास्तीत जास्त युवकांनी काँग्रेसचा विचार हा आत्मसात करायला हवा.असे ते शेवटी म्हणाले,

याप्रसंगी स्वप्नील बिनायकिया अली भाई शेख, कांचनराज जाधव,नंदकिशोर कापसे, जाफर भाई पठाण,हमीद शेख,गणेश धोत्रे,अजय शेजुळ,विशाल भुजबळ,महेश शिरसाठ,विलास जाधव,तोसिफ राजे, केवल गांगुर्डे,सतीश भालेराव,दुर्योधन गांगुर्डे,नाना माळी, दीपक आढाव,विकी पांगारकर,प्रवीण साळवे,कुणाल साळवे,राहुल पगारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले तर आभार कृष्णा सोनवणे यांनी मानले.

## मंगळवेढ्यातून अनिल सावंत यांचा शब्द

# महिलांच्या डोक्यावरचा हंडा उतरवणार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी

मंगळवेढा येथे पाटखळ सिद्धापूर या ठिकाणी मंगल कार्यालयात खेळ पैठणीचा, ११ ऑक्टोंबर २०२४ भैरवनाथ शुगर कारखान्याचे व्हाईस चेअरमन अनिल सावंत यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

मंगळवेढा तालुक्याचे हा चौथा खेळ पैठणीचा कार्यक्रम होता. यापूर्वी मंगळा तालुक्यातील एकूण तीन खेळ पैठणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते महिलांचा वार्ता प्रतिसाद पाहून मंगळवेढा मध्ये पुन्हा एकदा कार्यक्रम घेतला आहे.

या कार्यक्रमात दीप प्रजनन केल्यानंतर अनिल सावंत यांनी उपस्थित महिलांचे संवाद साधला व आपल्या भाषणामध्ये अनिल सावंत म्हणाले मंगळवेढाने माझ्यावर खूप प्रेम केले आहे तुमच्या वाढत्या प्रतिसादामुळे मी पैठणी कार्यक्रमाचे आयोजन केले मर्डर कारखाना उभा केला आहे निवडणुका आल्यावरच म्हणून तुमच्याशी संवाद साधू आहे निश्चित सोडणार आहे उमेदवारी वेळ अथवा न मिळो मी पंढरपूर मंगळवेढा जनतेसाठी काम करत राहणार आहे उमेदवारी पवार साहेबांकडे उमेदवारी मागितली आहे मला उमेदवारी मिळेल अशी आशा आहे येणाऱ्या विधानसभेला तुम्ही मला संधी द्या या संधीचे मी सोने करीन अशी विनंती करत अनिल सावंत उपस्थित आश्वासनही दिले.

साडेचार हजारहून अधिक महिलांनी उपस्थितीत होती उपस्थिती प्रत्येक अनिल सावंत साडीचे वाटप करण्यात आले.

## विठ्ठल रुक्मिणी मंदिर : १३ कोटीचा निधी वितरीत

## मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती

# तिरूपतीच्या धर्तीवर टोकण दर्शन व्यवस्थेकामी नामांकित टिसीएस कंपनीला प्रस्ताव





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी) : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनरांगेत दर्शन मंडप व स्काय वॉक या माध्यमातून भाविकांना सुलभ दर्शन व्यवस्था व्हावी, यासाठी आराखडा तयार करण्यात आला होता. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे हे आषाढी एकादशी च्या नियोजनाची पाहणी करण्यासाठी दर्शन रांगेत पत्राशेड येथे आले होते. त्यावेळी त्यांना दर्शन मंडप व स्काय वॉकसाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत मंदिर समितीचा सह अध्यक्ष या नात्याने मंदिर समितीच्या वतीने विनंती केली होती.

त्यावर मुख्यमंत्री महोदयांनी, प्रस्ताव तयार करून शासनास तात्काळ सादर करावा असे निर्देश जिल्हाधिकारी, सोलापूर यांना दिले होते. जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरीय समितीची मंजुरी घेऊन, शासनास प्रस्ताव सादर केला होता. त्यास उच्चाधिकार समितीची मंजुरी घेऊन रूपये १२९.४९ कोटीचा आराखडा राज्य शिखर समिती समोर सादर केला होता. या आराखड्यास शिखर समितीने मंजुरी देऊन दि.११ ऑक्टोंबर रोजी शासन निर्णय निर्गमित करून १३ कोटीचा निधी वितरीत केल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्रींच्या दर्शनरांगेत कायमस्वरूपी व्यवस्था करण्याच्या दृष्टीने स्कायवॉक व दर्शनहॉल बांधकाम करणेकामी आराखडा तयार करून मंदिर समितीने सन २०१८ मध्ये मंदिर समितीच्या सभेत ठराव पारीत केला होता. या दर्शन हॉल व स्कायवॉकचे संपूर्ण व्यवस्थापन, टोकन दर्शन व्यवस्था, देखभाल दुरुस्ती, सुरक्षा व्यवस्था, अन्नछत्र, स्वच्छता व इतर अनुषंगिक सर्व सोयी सुविधा मंदिर समितीमार्फत उपलब्ध करून देण्याबाबत मंदिर समितीने पुढाकार घेतला आहे. सदर आराखड्यातील काम पूर्ण झाल्यानंतर दर्शनार्थी भाविकांना जलद व सुलभ दर्शन होण्यास मदत होणार आहे.

दर्शनमंडप १६१८५ चौ.मी इतक्या जागेत असून, वॉटर हार्वेस्टींग, सीसीटीव्ही, सुरक्षा, सार्वजनिक सुचना प्रणाली, ऑर्गनिक वेस्ट कन्वेंटर, सेव्हेज मॅनेजमेंट सिस्टीम इत्यादी सोईयुक्त २ मजली आहे. त्यासाठी सुमारे ८७.३१ कोटी खर्च अपेक्षित आहे. तसेच स्कायवॉक हा श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप ते पत्राशेड पर्यंत १०५० मीटर लांबीचा असून, २ मीटर रूंदी व जमिनीपासून ४ मीटर उंच व इतर मुलभूत सोई सुविधांयुक्त असून, ४२.१८ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत करण्यात येणार असून, सदर काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या देखभालीची तसेच इतर अनुषंगीक कामांची जबाबदारी व कार्यान्वयीन यंत्रणा ही श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर राहील असे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

तसेच श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या दर्शन रांगेसाठी टोकन प्रणाली प्रस्तावित आहे. जेणेकरून भाविकांना सहज आणि लवकर दर्शन घेता येईल. या संदर्भात अनेक मोठ्या मंदिराशी संपर्क साधला असता, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, बेंगलोर ही कंपनी सेवाभावी तत्त्वावर त्या ठिकाणी टोकन प्रणाली मोफत उपलब्ध करून देत असल्याची माहिती मिळाली आहे.

त्यामुळे सदर कंपनीशी लेखी पत्रव्यवहार करून संपर्क साधण्यात येत आहे. महाराष्ट्र सरकार यासाठी पायाभूत सुविधा उभारणार असून टोकन प्रणाली मंदिर समिती चालवणार आहे. या कंपनीने सेवाभावी तत्त्वावर तिरुपती, शिर्डी आणि अयोध्या मंदिरांमध्ये मोफत टोकन प्रणाली उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे त्यांना मंदिर समितीसाठी टोकन दर्शन व्यवस्थेकामी सॉफ्टवेअर उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव देण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### दमानी नगर येथील अपघातात आईसह दोन मुले जखमी

सोलापूर (प्रतिनिधी) दमानी नगर येथील शुभम हॉस्पिटल गार्डन जवळ एका अनोळखी दुचाकी चालकाने धडक दिल्याप्रकरणी आईसह दोन मुले जखमी झाल्याची घटना १० ऑक्टोंबर रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी तेजस्विनी सागर मंद्रूपकर (वय-३०-,रा. समर्थ को-ऑपरेटिव्ह सोसायटी,एस आर पी कॅम्प,विजापूर रोड) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून एका अनोळखी दुचाकी चालक व त्याच्यासोबत इतर दोन मित्र यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भालशंकर हे करीत आहे.

### हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३. सीडी.५०६५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ११ ऑक्टोंबर रोजी रात्री साडेसात ते साडेआठ वाजण्याच्या दरम्यान रूपा भवानी चौक येथे घडली.याप्रकरणी धिरेंद्रकुमार अर्जुन रजक (वय-४३-,रा.तारांगण अपार्टमेंट,दमानी नगर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल आरेनवरु हे करीत आहेत.

तर दुसऱ्या घटनेत फिर्यादी विशाल श्रीनिवास अंकाराम (वय-३४,रा.जोडभावी पेठ) यांची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १० ऑक्टोंबर रोजी सकाळी साडेनऊ ते साडेदहाच्या दरम्यान रूपाभवानी मंदिराच्या पेट्रोल पंपा समोरील सर्विस रोडवर घडली.याप्रकरणी विशाल अंकाराम यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल शिवशरण हे करीत आहेत.

# श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरात दसरा उत्साहात साजरा

## दसरा सणानिमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिराला सुवर्ण झळाली, झेंडूच्या फुलांची आकर्षक सजावट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या विजया दशमीच्या (दसरा) निमित्ताने श्री विठ्ठल - रुक्मिणी मंदिरात झेंडू फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दसरा सण पारंपरिक पद्धतीने व उत्साहात साजरा करण्यात आला असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.




दसरा अर्थात विजया दशमी. यानिमित्त लाखो वैष्णवांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री विठ्ठल आणि रुक्मिणी मंदिरास आकर्षक फुलाने सजविले आहे. यासाठी सुमारे १ टन झेंडू व आपट्याच्या पानाचा वापर केला असून, पुणे येथील दानशुर भाविक राम जांभूळकर यांनी सेवाभावी तत्वावर मोफत सजावट केली आहे. सोनेरी रंगाच्या या झेंडू फुलांनी देवाचा गाभारा उजळून निघाला आहे.

तसेच सकाळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते ध्वजपूजन होऊन नवीन ध्वज लावण्यात आला. संत नामदेव पायरी येथून सायंकाळी सवाद्य रथ मिरवणूक निघून रिध्दीसिध्दी गणपती मंदिराजवळ सिमोल्लंघन करून प्रदक्षिणा मार्गावरून संत नामदेव पायरी जवळ आली. त्यानंतर नगर प्रदक्षिणा मार्गाने पालखी मिरवणूक काढण्यात आली. तसेच सणानिमित्त संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामधील भोजनप्रसादाचा गोड पदार्थाचा समावेश करण्यात आला होता. त्याचा सुमारे १५०० भाविकांनी लाभ घेतला. तसेच दर्शनरांगेत पिण्याचे पाणी व चहा वाटप व्यवस्था करण्यात आली आहे.

भाविकांना विठ्ठल रूक्मिणी मंदिरात व परिवार देवता मंदिरात आवश्यक व पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

तसेच कै विलास रंगनाथ नलबिलवार यांचे स्मरणार्थ रविंद्र विलास नलबिलवार व रोहित विलास नलबिलवार राहणार पंढरपूर यांनी अन्नछत्रास सुमारे एक लाख किंमतीचे गहू, गुळ, शेंगदाणे, मसाला व इतर अनुषंगीक असे अन्नधान्य व किराणा माल देणगीरूपी उपलब्ध करून दिला आहे.



# भिमाई आश्रमशाळेत दांडिया कार्यक्रम उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट संचलित प्राथमिक,माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात (दि.११) शुक्रवारी रोजी नवरात्रीनिमित्त दांडीयाचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्या अनिता साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांच्या मदतीने गरबा दांडियाचा सोहळा उत्साही वातावरणात व शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी गरबा व दांडिया नृत्याचा मनमुराद आनंद घेतला.




दिवंगत रत्नाकर मखरे तात्यांची शिक्षण संस्था ही अभ्यासाबरोबरच संस्कृतीचा ठेवा असणारी, जपणारी व संस्कार जोपासण्याचा अविरत प्रयत्न करणारी म्हणून तिचा नावलौकिक आहे. संस्था नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असते. विद्यार्थ्यांना भारतीय सण, संस्कृती, परंपरांची माहिती व्हावी यासाठी शैक्षणिक संकुलात संस्थाप्रमुख शकुंतला मखरे( काकी) यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक नेहमीच वेगवेगळे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत असतात.असे सचिव ड. समीर मखरे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करतेवेळी म्हणाले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी दांडियाच्या मनमुराद आनंद घेतला.

# राष्ट्रध्वजाचा अवमान प्रकरणी आगर व्यवस्थापक जुनेदी यांची तडकाफडकी बदली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट आगाराचे आगार व्यवस्थापक जुनेदि यांनी दिनांक-२६ जानेवारी २०२४ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिना दिवशी ध्वजारोहण करत असताना आगार व्यवस्थापकासारख्या जबाबदार पदावर कार्यरत असताना बेजबाबदारपणे कोणताही शासकीय आदेश अथवा दुखावठा नसताना राष्ट्रध्वज हा ध्वजस्तंभाच्या टोकापासून साधारण दोन फूट खाली फडकवून मानवंदनेचे आदेश दिले.

व त्याचं अवस्थेत राष्ट्रीय ध्वज हा ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपेपर्यंत म्हणजेच साधारण एक तासापेक्षा जास्त कालावधी फडकवीत ठेऊन राष्ट्रध्वजाचा अवमान करून तमाम भारतवासीय नागरिकांचा तसेच शहीद जवान, स्वातंत्र्यसंग्रामासाठी लढलेल्या स्वातंत्र्यवीरांच्या भावनेला ठेस पोचविल्याबद्दल जुनेदी यांचे वर खाते कारवाई करून रा.प. प्रशासनामार्फत जुनेदी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात वारंवार तक्रारी दाखल करून सुद्धा राष्ट्रध्वजाच्या अवमान केल्याप्रकारणी सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाने तक्रार दाखल केली होती. त्यांच्यावर कारवाई होत नसल्याने १५ ऑगस्ट २०२४ रोजी जुनेदी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यास मा. जिल्हाधिकारीसो सोलापूर यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिल्यानंतर सोलापूर विभागीय कार्यालयाने जुनेदि यांना जबाबदार धरून कारवाई करण्याचा प्रस्ताव प्रादेशिक कार्यालय पुणे यांच्याकडे दिनांक-०८/०८/२०२४ रोजी पाठविला असता जुनेदि यांचेवर कारवाईस प्रशासन चालढकल करीत असल्याची बाब निदर्शनास येताच सेवाशक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघ महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष संजय हराळे यांनी ०२ ऑक्टोबर गांधी जयंती दिवशी मा. विभागीय आयुक्त सो, पुणे विभाग पुणे यांच्या कार्यालयासमोर आत्मदहन आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर मा. प्रादेशिक व्यवस्थापकसो,पुणे यांनी संघटनेचे सरचिटणीस सतीश मेटकरी, उपाध्यक्ष संजय हराळे, कार्याध्यक्ष श्री सपकाळ व श्री पानिनाथ नलावडे त्यांच्या समवेत चर्चा करून दिनांक-०१/१०/२०२४ रोजी जुनेदि यांचा बदली बाबतचा अहवाल मा. महाव्यवस्थापकसो, मध्यवर्ती कार्यालय मुंबई यांच्याकडे सादर केला असता तडफदार निर्णयासाठी परिचित असलेले मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून जुनेदि यांची रत्नागिरी विभागातील मंडणगड आगारात शिक्षेवर बदली केल्याने अधिकारी वर्गासह कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

> राष्ट्रध्वज अर्धवट फडकवून राष्ट्रध्वजाचा अवमान करून तमाम भारतवासीयांच्या व देशाच्या रक्षणासाठी व स्वातंत्र्यासाठी शहीद झालेल्या जवानांचा तसेच महापुरुषांच्या आत्मसन्मानास तडा पोचविलेल्या अक्कलकोटच्या आगार व्यवस्थापक जुनेदी त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची आम्ही पत्राद्वारे रा. प. प्रशासनास विनंती केली असून त्यांनी गुन्हा दाखल करणे गरजेचे असताना त्यांनी तसे न केल्यास राष्ट्रध्वजाचा अवमान प्रकरणी आमच्या मार्फत जुनेदी यांचेवर दिनांक-१५/१०/२०२४ रोजी दाखल करू.
>
> **- सतीश मेटकरी** (सरचिटणीस, सेवा शक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघ महाराष्ट्र राज्य)

# पंढरपुरात धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त भव्य मिरवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त तथागत गौतम बुद्ध हे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

मनसेने ते दिलीप धोत्रे यांची मिरवणूक सामील होऊन बौद्ध बांधवांना शुभेच्छा दिल्या. या मिरवणुकीचे आयोजन भीम शक्ती सांस्कृतिक बहुउद्देशीय राममता महिला मंडळ पंढरपूर यांच्या वतीने करण्यात आले होते यावेळी भीमशक्ती सांस्कृतिक व रममता महिला मंडळाने संतोष सर्व गोड ज्येष्ठ नेते नानासाहेब कदम, पत्रकार अभिराज उबाळे, शिवाजी चंदनशिवे रवी सर्व गोड सचिन भोरकडे अँड किशोर खिलारे विठ्ठल वाघमारे रिपब्लिकन सेनेचे सागर गायकवाड आधी सह बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी गाण्याच्या तालावर लेझीम ते उत्कृष्ट असे सादरीकरण करण्यात आले. धम्मचक्र परिवर्तन दिन दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी साजरा केला जातो. भारतीय राज्यघटनेचे निर्माते १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी अनुसया सोबत बौद्ध धर्म स्वीकारला त्यामुळे ह्या दवस धम्मचक्र परिवर्तन दिन म्हणून बौद्ध समुदायांमध्ये महत्त्वपूर्ण आणि आदरणीय बौद्ध समुदायांमध्ये तेव्हापासून हा दिवस बौद्ध समाजातील लोक मोठ्या आदराने आणि उत्साहाने साजरा करतात.





# भांडगाव येथील नेत्र तपासणी शिबिरास नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील भांडगाव येथे माजी बांधकाम आरोग्य सभापती जिल्हा परिषद पुणे श्री प्रविण माने यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिरास भांडगाव व परिसरातील नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने सुरवात झाली. भांडगाव प्राथमिक आरोग्य उपकेंद्र भांडगाव येथे सकाळी दहा ते पाच या वेळेत ७९१ नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली असून यातील ५२४ नागरिकांना चष्मे वाटप करण्यात आले तर १० नागरिकांची पुणे भारती विद्यापीठ येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

प्रविण माने यांच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचा असंख्य नागरिकांनी लाभ घेतला असून प्रत्येक गावात नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे चित्र आहे. भांडगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे बाळू गायकवाड, अजित मदने, सतीश पोळ, महेश गायकवाड, तुकाराम शिंदे, सनी चांडोले, निलेश रंधवे, छगन बनसुडे, अंकुश दोरकर यांनी आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने राजेंद्र जाधव, दिनकर गायकवाड, गायकवाड सर, अमोल जाधव, नवनाथ गावडे, नवनाथ भोसले, कैलास शिंदे, बाळू माने, मनोहर कोकणे, गोपाळ ठोंबरे, बाळू गायकवाड, अमोल गायकवाड, सतीश पोळ, तुकाराम शिंदे, सनी चांडोले, अजित मदने, दत्तात्रय गायकवाड, रतनलाल सूर्यवंशी, मयूर लोंढे, दीपक वीर, मुबारक आत्तार, समद सय्यद, नागेश गायकवाड, संदीप सोलनकर, निलेश रंधवे, संकेत वाघमोडे, संग्राम माने, छगन बनसुडे, गणेश मोहिते, निलेश माने, दिलीप कोकणे, शंकर कोकणे, महादेव जाधव, रामचंद्र गायकवाड, गणपत राऊत, युवराज कोकणे, अण्णा लावंड, विष्णू लावंड, देविदास परकाळे कांताबाई गायकवाड आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**विकासाचे व्हिजन असल्याने मतदारांकडूनही मिळाला आहे भक्कम शब्द**

**अभिजीत पाटील लवकरच सादर करणार जनतेच्या मनातील विकासाची ब्ल्यू प्रिंट**

# माढा मतदारसंघातील पुणे आणि पिंपरी चिंचवड भागात स्थायिक झालेल्या मतदारांशी अभिजीत पाटीलांनी साधला संवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे कर्तव्यतत्पर आणि गतिमान चेअरमन अभिजित पाटील यांनी माढा विधानसभा लढविण्याच्या दृष्टीने जोरदार तयारी सुरू केली आहे. माढा विधानसभा मतदारसंघातून आमदार होण्यासाठी या भागातील मतदारांची जनसंपर्क वाढवण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे.

**चेअरमन अभिजीत पाटील यांचा जनसंपर्क वाढीवर मोठा भर**

माढा तालुक्यातील मतदार असलेल्या पिंपरी चिंचवड आणि पुणे शहरात स्थायिक झालेल्या नागरिकांशीही गुरुवारी संवाद साधला असून,विकासाचे व्हिजन असलेल्या चेअरमन अभिजीत पाटील यांना या मतदानातून उत्स्फूर्त प्रतिसाद देण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड भागातील मतदारांना कलासागर हॉल येथे सकाळी तर पुणे येथील मतदाराशी हडपसर येथील राजयोग लॉन्स याठिकाणी जनसंवाद साधला आहे.

> **माढा मतदारसंघातील पुणे, पिंपरी चिंचवड शहरामध्ये स्थायिक झालेल्या नागरिकांशी संवाद साधला असून मूलभूत सोयीसुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती, महिला सक्षमीकरण तसेच उद्योग निर्मिती अशा विविध विषयांवर काम करून पुणे-मुंबई सारखी आपले गाव आपल्या तालुक्यात सुधारणा व्हावी. यासाठी काम करणार असून नागरिकांचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवूनच आपला विधानसभेचा विकास कामाचा अजिंठा असणार असा विश्वास उपस्थित नागरिकांना अभिजीत पाटील यांनी दिला.**

या संवाद कार्यक्रम प्रसंगी माढा मतदारसंघात मूलभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती, महिला सक्षमीकरण, तसेच उद्योग निर्मिती अशा विविध विषयावर प्रत्येकाने आपली भूमिका मांडली. पुणे-मुंबई सारखं आपलं गाव, आपल्या तालुक्यात सुधारणा व्हावी यासाठी प्रत्येकाची तळमळ दिसत होती. त्याच मताचा मी जाहीरनामा (विकासाची ब्लू प्रिंट) तयार करणार असून लवकरच तो आपल्या समोर सादर केला जाईल. असे अभिजित पाटील यांनी विश्वास देऊन सांगितले.



आपल्या घरचा माणूस भेटल्यानंतर बोलल्यानंतर नवीनच एक ऊर्जा आणि बळ मिळतं, त्याची प्रचिती आली. नक्कीच दरवर्षी या स्नेहमेळाचा आयोजन आणि एकत्र येण्याचा संकल्प करून प्रत्येकाच्या सुख, दुःखामध्ये उभे राहण्याचं आश्वसनही यावेळी उपस्थित मतदारांना देण्यात आले. यावेळी या बांधवांचं प्रेम आणि भरभरून प्रतिसाद पाहता नक्कीच येत्या काळात यश मिळेल अशी आशाही अभिजित पाटील यांनी व्यक्त केली आहे .यावेळी हजारोच्या संख्येने मतदार, युवक तरूण मंडळीसह, महिला भगिंनी देखील उपस्थित होत्या..